कार्यरत व सेवानिवृत्त राज्य शासकीय अधिकारी / कर्मचारी व अखिल भारतीय सेवेतील अधिकारी यांचेकरिता वैद्यकीय प्रतिपुर्तीची विमाछत्र योजना.

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**संचालनालय, लेखा व कोषागारे,**
**तळ मजला, कस्तुरी इमारत,**
**ज. टाटा मार्ग, पेट्रोलियम हाऊस समोर, चर्चगेट, मुंबई-४०० ०२०.**

## परिपत्रक

क्र. संलेको/गवियो/२०२४/वैद्यकीय प्रतिपुर्तीची विमाछत्र योजना/८२ दिनांक : 22 JUL 2025

संदर्भ :-१. शासन निर्णय, क्रमांक संकिर्ण-२०१४/प्र.क्र.४०/२०१४ कोषा.प्रशा-४, दि. ०९ जूलै, २०१४.
२. शासन निर्णय, क्रमांक संकिर्ण-२०१४/प्र.क्र.४०/२०१४ कोषा.प्रशा-४, दि. २५ जून, २०१५.
३. शासन निर्णय, क्रमांक संकिर्ण-२०१४/प्र.क्र.४०/२०१४, कोषा प्रशा-४, दि.२८ जून २०१६.
४. शासन निर्णय, क्रमांक संकिर्ण-२०१४/प्र.क्र.४०/भाग -१/२०१४, कोषा प्रशा -४, दि.१७. जुलै, २०१७.
५. शासन निर्णय, क्रमांक संकीर्ण-२०१४/प्र.क्र.४०/भाग -१/कोषा प्रशा -४, दि.१६ जुलै, २०१८.
६. संचालनालयाचे परिपत्रक क्र. संलेको/गवियो/२०१८/वैद्यकीय प्रतिपूर्तीची विमाछत्र योजना/७७, दिनांक १८ जुलै, २०१८.
७. शासन निर्णय, क्रमांक संकीर्ण-२०१४/प्र.क्र.४०/भाग -१/कोषा प्रशा -४, दि.१९ जुलै, २०१९.
८. संचालनालयाचे परिपत्रक क्र. संलेको/गवियो/२०१९/वैद्यकीय प्रतिपूर्तीची विमाछत्र योजना/१०७, दिनांक २५ जुलै, २०१९
९. शासन निर्णय, क्रमांक संकीर्ण-२०१४/प्र.क्र.४०/भाग -१/कोषा प्रशा -४, दि.१३ जुलै, २०२०.
१०. संचालनालयाचे परिपत्रक क्र. संलेको/गवियो/२०२०/वैद्यकीय प्रतिपूर्तीची विमाछत्र योजना/४९, दिनांक १५ जुलै, २०२०
११. शासन निर्णय, क्रमांक संकीर्ण-२०१४/प्र.क्र.४०/भाग -१/कोषा प्रशा -४, दि.१६ जुलै, २०२१.
१२. संचालनालयाचे परिपत्रक क्र. संलेको/गवियो/२०२१/वैद्यकीय प्रतिपूर्तीची विमाछत्र योजना/ ७८, दिनांक २२ जुलै, २०२१.
१३. शासन निर्णय, क्रमांक संकीर्ण-२०१४/प्र.क्र.४०/भाग -१/कोषा प्रशा -४, दि. २१ जुलै, २०२२.
१४. संचालनालयाचे परिपत्रक क्र. संलेको/गवियो/२०२२/वैद्यकीय प्रतिपूर्तीची विमाछत्र योजना/ ७२, दिनांक २६ जुलै, २०२२.
१५. शासन निर्णय, क्रमांक संकीर्ण-२०१४/प्र.क्र.४०/भाग -१/कोषा प्रशा -४, दि.२४ जुलै, २०२३
१६. संचालनालयाचे परिपत्रक क्र. संलेको/गवियो/२०२४/वैद्यकीय प्रतिपूर्तीची विमाछत्र योजना/८६, दिनांक २४ जुलै, २०२३.
१७. शासन निर्णय, क्रमांक संकीर्ण-२०१४/प्र.क्र.४०/भाग -१/कोषा प्रशा -४, दि.२३ जुलै, २०२४.
१८. संचालनालयाचे परिपत्रक क्र. संलेको/गवियो/२०२४/वैद्यकीय प्रतिपूर्तीची विमाछत्र योजना/९४/६९, दिनांक २९ जुलै, २०२४.
१९. शासन निर्णय, क्रमांक संकीर्ण-२०१४/प्र.क्र.४०/भाग -१/कोषा प्रशा -४, दि. १८ जुलै, २०२५.

शासकीय सेवेच्या अंतिम वर्षात पदार्पित शासकीय अधिकारी/कर्मचारी व नुकतेच सेवानिवृत्त झालेले शासकीय अधिकारी/कर्मचारी व कुटूंब निवृत्तीवेतनधारक तसेच सेवानिवृत्त झालेले अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी

गट विमा तत्वावर आधारित वैद्यकीय प्रतिपूर्तीची विमाछत्र योजना दि. ९ जुलै २०१४ च्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आली. सदर योजना सेवानिवृत्त होणाऱ्या सर्व गट अ, ब, क व ड अधिकारी/कर्मचारी व अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांना सक्तीची राहील, असे योजनेचे सुरुवातीचे स्वरूप होते. विमा कंपनीने वेळोवेळी पारीत केलेल्या वैद्यकीय दाव्यांच्या अनुभवानुरुप व योजनेच्या आढाव्यानुसार सदर योजनेचे नूतनीकरण करीत असताना योजनेची व्याप्ती वाढविण्याकरिता त्यामध्ये वेळोवेळी बदल करण्यात आले आहेत.

"विमाछत्र योजनेचे" नूतनीकरण करण्यासंदर्भातील शासन निर्णय संदर्भ क्र. १९ अन्वये निर्गमीत करण्यात आला आहे. या वर्षी "दि न्यु इंडिया ॲश्युरन्स कंपनी" यांनी सदर योजना दोन गटांमध्ये विभागणी करुन प्रस्तावित केलेली आहे.

१. ४६-५८ वर्षे वयोगटातील कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी व सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी मागील वर्षांप्रमाणेच अटी व शर्ती पुढे चालू राहतील.

२. १८-३५ वर्षे व ३६-४५ वर्षे वयोगटातील कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांचा सदर योजनेमध्ये सहभाग वाढावा याकरिता नवीन गट प्रस्तावित करण्यात आला आहे. त्यांच्याकरिता नवीन अटी व शर्ती समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

. सदर योजना सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी/कर्मचारी व अखिल भारतीय सेवेतील अधिकारी यांना सक्तीची राहणार नसून स्वेच्छेने आवश्यक तो वार्षिक हप्ता भरून सबंधित अधिकारी/कर्मचारी या योजनेमध्ये सहभागी होऊ शकेल.

विमाछत्र योजनेस अनुसरुन पुढीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहे.

**१. आहरण व संवितरण अधिकारी व कोषागार अधिकारी यांचेकरिता मार्गदर्शक सूचना**

१. विमाछत्र योजनेमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांचा योजनेतील सहभाग वाढावा याकरिता दि न्यु इंडिया ॲश्युरन्स कंपनीने २५ वर्षे वयाच्या मर्यादेतील २ मुलांचा समावेश केला आहे. तसेच कर्मचाऱ्याच्या वयोगटनिहाय (१८-३५ वर्षे, ३६-४५ वर्षे, ४६-५८ वर्षे) प्रिमीयम आकारणी केली आहे. योजनेस अधिक प्रसिध्दी मिळावी याकरिता योजनेचे परिपत्रक कार्यालयामध्ये दर्शनी भागावर लावण्याच्या सूचना कोषागार अधिकारी यांनी आहरण व संवितरण अधिकारी यांना द्याव्यात. कोषागार कार्यालयांनी देखील विमा हप्त्याचा तपशील कार्यालयाच्या दर्शनी भागात लावावा. तसेच, कोषागार अधिकारी आणि आहरण व संवितरण अधिकारी यांनी जिल्हानिहाय TPA व PPN हॉस्पिटलची यादी कार्यालयाच्या दर्शनी भागात लावावी.

२. विमा पॉलिसीचे नूतनीकरण करताना, विमा हप्त्याचे प्रदान विमा कंपनीस https://easypay.axisbank.co.in/easyPay/makePayment?mid=NTg४MzQ%3D या लिंकद्वोर करणे बंधनकारक असणार आहे. सदर पेमेंट लिंकचा वापर करुन NEFT/RTGS/UPI अथवा Credit

Card द्वारे करता येऊ शकते. सदर लिंकद्वारे Debit card द्वारे विमा हप्ता प्रदान करता येऊ शकणार नाही.

३. योजनेमध्ये नूतनीकरणासाठी उपरोक्त लिंक संबंधित विमाधारकास त्याच्या SMS द्वारे मोबाईलवर अथवा ईमेलद्वारे प्राप्त होणार आहे. अशाप्रकारची लिंक प्राप्त न झाल्यास विमा कंपनीच्या कार्यालयास संर्पक साधावा.(The New India Assurance Co. Ltd. यांचेशी ९५०३०१९९६७ या क्रमांकावर संपर्क साधावा.)

४. संदर्भ क्र. १९ च्या शासन निर्णयासोबत "परिशिष्ट-१" जोडण्यात आहे. त्यानुसार आवश्यक तपशील नोंदवून सदर "परिशिष्ट-१" आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी सेवानिवृत्तीवेतन प्रकरणासोबत कोषागारात सादर करावयाचा आहे.

५. नवीन सभासद नोंदणीसाठी कोषागार अधिकारी व आहरण व संवितरण अधिकारी यांना विमाधारकाची व विमा हप्ता प्रदानाची अचूक माहिती खालील google फॉर्ममध्ये विमा कंपनीस कळायची आहे. https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSfbSX5g_NHgnAWxOW_hkl5kVarBCFOXgxM58Gr4sPkHAqb7pA/viewform?usp=dialog

६. तसेच, योजनेमध्ये समाविष्ठ होण्याकरिता कायमस्वरुपी प्रतिबंधीत केलेल्या अशा कर्मचाऱ्यांची यादी सर्व कोषागारांना विमा कंपनी पुरविल. योजनेमध्ये समाविष्ठ होण्याकरिता कायमस्वरुपी प्रतिबंधीत केलेल्या कर्मचाऱ्यांकडून विमा हप्ता विमा कंपनीच्या खात्यावर जमा होणार नाही याची खबरदारी कोषागार कार्यालये व आहरण व संवितरण अधिकारी यांनी घ्यावयाची आहे. तसेच, सदर यादी आहरण व संवितरण अधिकारी यांनी संबंधित कोषागाराकडून प्राप्त करुन घेण्यात यावी.

७. यावर्षीही २५ वर्षे वयाच्या मर्यादेतील अपत्यांचा समावेश या योजनेमध्ये केला असल्यामुळे कोषागार अधिकारी/ आहरण व संवितरण अधिकारी यांनी सदर योजनेमध्ये नवीन नोंदणी करताना, google फॉर्ममध्ये कर्मचाऱ्याच्या अपत्यांचा वयाचा पुरावा तपासून त्यानुसार अचूक जन्मदिनांक फॉर्ममध्ये नोंदवावे. वैयक्तिक तपशील व रक्कम प्रदानाचा तपशील अचूक नोंदवावा.

८. फोटो विरहीत ओळखपत्र विमा कंपनीकडून दिले जाणार असल्यामुळे google फॉर्म भरण्याकरिता कर्मचारी अथवा त्यांचे कुटूंबिय यांच्या फोटोची आवश्यकता नाही.

९. विमाधारकास ओळखपत्र मिळण्यास विलंब होतो, त्यामुळे तो उपचारांपासून वंचित राहू नये याकरिता MDIndia यांचे संकेतस्थळावर e- I Card ची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. विमाधारकाची योजनेमधील नोंदणीची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर व संबंधितांस भ्रमणध्वनीवर विमा कार्ड नंबर प्राप्त झाल्यानंतर e- I Card मिळण्याकरिता खालील नमूद टप्प्यांचा अवलंब करण्यात यावा.

https://mdindiaonline.com → Quick Links → Instant E- Card → Insurance Company Name (The New India Assurance Co. Ltd. सीलेक्ट करावे) → Type of Policy (Corporate

सीलेक्ट करावे) → MDID Card No. (आपल्या भ्रमणध्वनीवर प्राप्त झालेला MDID Card No. नमूद करावा.) → Search वर क्लिक करावे.

१०. संदर्भ क्र. १९ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार, विमाछत्र योजना सन २०२५-२६ मध्ये दिनांक १ जुलै, २०२५ ते ३० जून, २०२६ या कालावधीमध्ये सेवानिवृत्त होणारे अधिकारी व कर्मचारी स्वेच्छेने आवश्यक तो वार्षिक हप्ता भरुन योजनेमध्ये सहभागी होण्यास पात्र ठरतील.

११. शासकीय सेवेत कार्यरत अधिकारी/कर्मचारी हे विमाछत्र योजनेव्यतिरिक्त अन्य विमा पॉलिसीचे सभासद असले तरीही सदर शासकीय अधिकारी/कर्मचारी विमाछत्र योजनेमध्ये सभासद होऊ इच्छित असल्यास वरील नमूद अटींच्या अधिन राहून आवश्यक तो विमा हप्ता भरुन या योजनेमध्ये सहभागी होऊ शकतात.

१२. विमाछत्र रक्कम ही कर्मचाऱ्याने स्विकारलेल्या पर्यायानुसार (फक्त कर्मचारी स्वत:/१+३) तसेच कर्मचाऱ्याच्या वयोगटनिहाय (१८-३५ वर्षे, ३६-४५ वर्षे, ४६-५८ वर्षे व सेवानिवृत्त कर्मचारी) संपूर्ण गटाकरिता उपलब्ध असेल. तसेच, सर्व विवाहीत अधिकारी/कर्मचाऱ्यांना सदर योजनेमध्ये नवीन नोंदणी व नुतनीकरण करतांना १+३ या पर्यायाचा अवलंब करावा लागणार आहे.

१३. मागील वर्षी वैद्यकीय दाव्याच्या प्रतिपूर्तीचा लाभ घेतलेले विमाधारक ते ज्या विमाछत्र रकमेचे सभासद होते त्याच रकमेचे किंवा त्यापेक्षा कमी विमाछत्र रकमेचे सभासद यावर्षी होऊ शकतात. मात्र मागील वर्षी वैद्यकीय दाव्याच्या प्रतिपूर्तीचा लाभ न घेतलेले विमाधारक हे यावर्षी शासन निर्णयामध्ये मंजूर केलेल्या कोणत्याही विमाछत्र रकमेकरिता आवश्यक तो विमा हप्ता भरुन सभासद होऊ शकतात.

१४. कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना योजनेमध्ये सहभागी होण्याकरिता अग्रिमाची सुविधा उपलब्ध आहे. सदर अग्रिमाची देयके वेळेवर पारित न झाल्यामुळे विमा हप्ता विमा कंपनीस अदा करण्यास विलंब होतो. त्यामुळे विमाधारकांना सदर कालावधीमध्ये विमाछत्राचा लाभ घेता येत नाही. त्याअनुषंगाने सर्व आहरण व संवितरण अधिकारी व कोषागार अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, वैद्यकीय प्रतिपूर्तीची विमाछत्र योजनेच्या अग्रिमाची देयके प्राप्त झाल्यानंतर लवकरात लवकर निकाली काढण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावे.

१५. योजनमध्ये गतवर्षी समाविष्ट असलेल्या सदस्यांनी चालू वर्षी कोणत्याही परिस्थितीत ३० दिवसांच्या आत विमा हप्त्याचा भरणा करुन योजनेचे नुतनीकरण करणे ही विमा धारकाची वैयक्तिक जबाबदारी राहील. ३० दिवसांच्या मुदतीनंतर योजनेचे नुतनीकरण केल्यास असा सभासद योजनेमध्ये नव्याने समाविष्ट झाल्याचे समजले जाईल. (याकरिता आहरण व संवितरण अधिकारी अथवा कोषागार अधिकारी जबाबदार असणार नाहीत.)

## २. विमा हप्ता भरण्याची पध्दत

**(अ) <u>शासकीय सेवेत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी</u>**

१. शासकीय सेवेत कार्यरत असलेले अधिकारी/कर्मचारी यांना सदर योजनेत नव्याने सहभागी होण्याकरीता तसेच योजनेत नूतनीकरण करण्याकरीता विमा हप्त्याची रक्कम भरण्याकरिता **अग्रिम घेतले असल्यास** संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांचेकडून वार्षिक विमा हप्त्याची रक्कम स्वीकारण्याची पध्दत खालीलप्रमाणे आहे.

१.१ सदर अग्रिमाचे देयक आहरण व संवितरण अधिकारी यांनी कोषागारात सादर करावे. कोषागाराने सदर देयक तात्काळ पारित करावे. आहरण व संवितरण अधिकारी यांचे खात्यावर अग्रिमाची रक्कम जमा झाल्यावर सदर रक्कम NEFT द्वारे The New India Assurance Co. Ltd. यांचे बँक खात्यावर तात्काळ जमा करावी. योजनेमध्ये पहिल्यांदा सहभागी होत असलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांचेबाबत सदर रक्कम प्रदानाचे तपशील (UTR No.) व अन्य तपशील आहरण व संवितरण अधिकारी यांनी google फॉर्ममध्ये नोंदवावा.

१.२ तसेच, अग्रिम घेऊन नूतनीकरण (Renew) केलेल्या अधिकारी / कर्मचारी यांचेबाबतीत आहरण व संवितरण अधिकारी यांनी रक्कम प्रदानाचा तपशील आवश्यक माहितीसह (विमा आयडी नं., नाव, मोबाईल नं., UTR No., रक्कम व प्रदानाचा दिनांक) विमा कंपनीला nia.142300@newindia.co.in अथवा swasthya@mdindia.com या मेल आयडीवर पाठवावा.

२. शासकीय सेवेत कार्यरत असलेले अधिकारी/कर्मचारी यांना सदर योजनेत नव्याने सहभागी होण्याकरीता **अग्रिम घेतले नसल्यास** स्वत: NEFT च्या स्वरुपात विमा हप्त्याची रक्कम The New India Assurance Co. Ltd. यांचे खात्यावर जमा करावी व रक्कम प्रदानाचा तपशील आहरण व संवितरण अधिकारी यांना कळवावा. योजनेमध्ये पहिल्यांदा सहभागी होत असलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांचेबाबत सदर रक्कम प्रदानाचे तपशील (UTR No.) व अन्य तपशील आहरण व संवितरण अधिकारी यांनी google फॉर्ममध्ये नोंदवावा. तसेच, योजनेत नूतनीकरण करण्याकरीता विमा हप्त्याची रक्कम भरण्याकरिता कंपनीद्वारे भ्रमणध्वनीवर प्राप्त झालेल्या Link द्वारे विमा हप्ता (NEFT/RTGS/Credit card/UPI) भरण्यात यावा. Debit Card द्वारे विमा हप्त्याचे प्रदान करण्यात येऊ नये.

**(ब) <u>सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी योजनेमध्ये नूतनीकरण करण्यासाठी</u>**

१. सेवानिवृत्त झालेले व योजनेमध्ये नूतनीकरण करु इच्छिणारे सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांनी योजनेत नूतनीकरण करण्याकरीता विमा हप्त्याची रक्कम भरण्याकरिता कंपनीद्वारे भ्रमणध्वनीवर प्राप्त

झालेल्या Link द्वारे विमा हप्ता (NEFT/RTGS/Credit card/UPI) भरण्यात यावा. Debit Card द्वारे विमा हप्त्याचे प्रदान करण्यात येऊ नये.

२. या योजनेमध्ये प्रथम सभासद होत असताना शासकीय कर्मचाऱ्याने रक्कम प्रदानाचा तपशील व वैयक्तिक तपशील आहरण व संवितरण अधिकारी यांना कळविणे व तो google फॉर्ममध्ये नोंदविणे आवश्यक असल्याच्या सूचना आहरण व संवितरण अधिकारी यांनी संबंधितास द्याव्यात.

**(क) विमा हप्ता भरण्याकरिता The New India Assurance Co. Ltd. यांचे बँक खात्याचा तपशील:**

१. **A/c. No. 911020038067076**

**IFS Code UTIB0000230, Axis Bank, Branch - BKC.**

२. **महत्त्वाच्या सूचना**

**२.१ विमा हप्त्याची रक्कम स्विकारण्याकरिता कोषागार अधिकारी यांचे नावे धनादेश/ धनाकर्ष स्विकारण्यात येऊ नये.**

**२.२ तसेच कोषागारात दि न्यु इंडिया अॅश्युरन्स कंपनी लि. यांचे नावे धनादेश/धनाकर्ष स्विकारण्यात येऊ नये.**

**२.३ विमा कंपनीच्या बँक खात्यावर रोखीने पैसे भरण्यात येऊ नये.**

**२.४ सहकारी बँकांमार्फत विमा कंपनीच्या खात्यावर रक्कम NEFT द्वारे वर्ग करण्यात येऊ नये.**

**३. विमा कंपनीची जबाबदारी**

३.१ विमाधारकांना ओळखपत्र ३० दिवसांत संबंधित विमाधारकाच्या घरच्या पत्त्यावर पाठविण्याची जबाबदारी विमा कंपनीची असेल. तसेच, सदर ओळखपत्रावर वैधता कालावधी नमूद असावा.

३.२ विमाधारकाने वैद्यकीय प्रतिपूर्तीचा दाव्यासंदर्भातील विमा कंपनीने ठरवून दिलेली आवश्यक ती कागदपत्रे TPA (MDIndia) यांचेकडे परस्पर सादर करावीत. TPA यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती दाव्यासंदर्भातील अधिक माहिती व कागदपत्रे आवश्यक असल्यास TPA यांनी प्रत्यक्ष विमाधारकाशी संपर्क साधावा.

३.३ विमाछत्र योजनेमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या PPN हॉस्पिटलबाबतची माहिती संबंधित कोषागार अधिकाऱ्यांना कळविण्यात यावी. तसेच विमा कंपनीच्या Website वर याबाबतचे Updation करण्यात यावे.

३.४ विमाछत्र योजनेतून वैद्यकीय प्रतिपूर्तीचा लाभ घेतलेले परंतु पुढील वर्षी नूतनीकरण न केलेल्या विमाधारकांची यादी संबंधित कोषागार अधिकाऱ्यांस कळविण्याची जबाबदारी विमा कंपनीची असेल.

३.५ विमा कंपनीने विमाछत्र योजनेची संपूर्ण माहिती देणारे माहितीपुस्तिका (Brochure) विमाधारकास व संचालनालयास, अधिदान व लेखा कार्यालय आणि कोषागार अधिकाऱ्यांस उपलब्ध करुन द्यावे.

३.६ विमाधारकास आयकर सवलतीचा लाभ घेण्याकरिता विमा कंपनीकडून आयकर सवलत प्रमाणपत्र संबंधितास वेळेत उपलब्ध होईल याद्दष्टीने परस्पर निर्गमीत करणे आवश्यक आहे.

३.७ विमाछत्र योजना राबविण्यामध्ये TPA यांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. MDIndia कंपनीकडून ज्या जिल्हयाकरिता TPA (Third Party Administrator) ची नेमणूक करण्यात आलेली नाही अशा जिल्हयांकरिता स्वतंत्र TPA ची नेमणूक करण्यात यावी. तसेच जिल्हा निहाय यादी विमा कंपनीच्या Website वर याबाबतचे Updation करण्यात यावे.

३.८ प्रतिवर्षी विमाछत्र योजनेचे नूतनीकरण करण्यासंबंधी व नूतनीकरण झाल्याची माहिती SMS द्वारे विमा कंपनीकडून कळविण्यात यावी.

**४.** विमाछत्र योजना प्रभावीपणे राबविण्याकरिता कोषागार कार्यालयामध्ये कोषागार अधिकारी व TPA यांची विमाछत्र तक्रारी निवारण संदर्भातील त्रैमासिक बैठक घेण्याबाबत संदर्भ क्र. ८ च्या परिपत्रकान्वये सुचित करण्यात आले होते. तरी, कोषागार अधिकारी व TPA यांनी आवश्यकतेनुसार परस्परांशी दूरध्वनीवर संपर्क साधून तक्रार निवारण संदर्भातील कार्यवाही करावी.

**(दीपा देशपांडे)**
**संचालक, लेखा व कोषागारे,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

प्रति,
१. सर्व विभागीय सहसंचालक लेखा व कोषागारे,
कोकण / पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर.
२. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
३. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
४. विभागीय व्यवस्थापक, दि न्यु इंडिया अॅश्युरन्स कंपनी लि., बांद्रा मंडल कार्यालय (१४२३००), बांद्रा-कुर्ला कॉप्लेक्स, मुंबई.
५. व्यवस्थापक, एमडीइंडिया हेल्थ इन्श्युरन्स टिपीए लि., फोर्ट, मुंबई.

प्रत- उपसचिव, कोषा प्रशा- ४, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.